आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

८ सप्टेंबर २०२५ - सोमवार

**ठळक बातम्या**

- खरीपाच्या पेरणी क्षेत्रात गेल्या वर्षीच्या तुलनेत २७ लाख हेक्टरनं वाढ

- उपराष्ट्रपतीपदासाठीच्या निवडणुकीत उद्या मतदान न करण्याचा बिजू जनता दल आणि भारत राष्ट्र समितीचा निर्णय

- बिहारमध्ये सुधारित मतदार याद्यांमध्ये समावेश करण्यासाठी आधार कार्डाला ओळखपत्र म्हणून मान्यता द्यावी, असे सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश

- नेपाळमधे समाजमाध्यम बंदीविरोधातल्या मोर्चावरच्या गोळीबारात १९ ठार तर ३४० हून जास्त जखमी

**आणि**

- आशियाई महिला हॉकी चषक स्पर्धेत सिंगापूरवर विजय मिळवून भारतीय संघाचा सुपर फोर फेरीत प्रवेश

**<><><><><>**

यंदाच्या खरीप हंगामात पेरणीखालच्या क्षेत्रात सुमारे २७ लाख हेक्टरनं वाढ झाली असून ते १०१ कोटी ५ लाख हेक्टरवर गेलं आहे. केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण खात्यानं जारी केलेल्या आकडेवारीनुसार भाताच्या लागवड क्षेत्रात १९ लाख हेक्टर इतकी लक्षणीय वाढ होऊन ते ४ कोटी ३८ लाख हेक्टर इतकं झालं आहे.

कडधान्यांची लागवड गेल्या वर्षीच्या १ कोटी १४ लाख हेक्टरवरून १ कोटी १६ लाख हेक्टर झाली आहे. १ कोटी ९१ लाख हेक्टर क्षेत्रावर तृणधान्यं, तर सुमारे १ कोटी ८७ हेक्टर क्षेत्रावर तेलबियांची लागवड झाली आहे.

**<><><><><>**

उपराष्ट्रपतीपदासाठीच्या निवडणुकीसाठी उद्या मतदान होणार आहे. रालोआचे उमेदवार, महाराष्ट्राचे राज्यपाल सी पी राधाकृष्णन आणि इंडिया आघाडीचे उमेदवार सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश न्यायमूर्ती बी सुदर्शन रेड्डी यांच्यात लढत होणार आहे.

संसदेच्या दोन्ही सभागृहांचे मिळून ७८१ सदस्य या निवडणुकीत मतदान करतील. दरम्यान, या निवडणुकीत मतदान न करायचा निर्णय बिजू जनता दल आणि भारत राष्ट्र समिती या दोन पक्षांनी घेतला आहे.

**<><><><><>**

भाजपा आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या खासदारांसाठीच्या दोन दिवसीय कार्यशाळेचा समारोप आज नवी दिल्लीत संसद भवनाच्या बालयोगी सभागृहात झाला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी यावेळी उपस्थित खासदारांना मार्गदर्शन केलं. कार्यशाळेत सहभागी झालेल्या खासदारांनी विविध मुद्द्यांवर त्यांची मतं मांडत विस्तृत चर्चा केली.

**<><><><><>**

वस्तू आणि सेवा कर परिषदेनं या कराच्या रचनेत नुकतेच महत्त्वाचे बदल केले. त्याचा परिणाम विविध क्षेत्रातल्या वस्तू आणि सेवांच्या किमतीवर होणार आहे. वैद्यकीय क्षेत्रातल्या अनेक वस्तूंच्या किमतीत बदल संभवतात. त्याविषयी सविस्तर माहिती ऐकूया आमच्या प्रतिनिधी कडून......

**होल्ड- व्हॉईस कास्ट- रश्मी पाटकर**

वैद्यकीय क्षेत्रात उपचारांसाठी वापरल्या जाणाऱ्या अनेक वस्तू, रसायनं आणि उपकरणांवरचा जीएसटी कर आता ५ टक्क्यांवर आणला आहे. वैद्यकीय वापरासाठीचा ऑक्सीजन, अमोनिया,तसंच सल्फ्युरिक आणि नायट्रिक ॲसिड वरचा कर पूर्वी १८ टक्के होता. रबरी हातमोजे, थर्मामीटर, विविध तपासण्यांसाठीचे संच,उपकरणं, चष्म्याची भिंगं, कॉन्टॅक्ट लेन्सेस, गॉगल्स

मलमपट्टीसाठी वापरली जाणारी बँडेजेस, या सर्वांवरचा कर आता १२ टक्क्यांऐवजी ५ टक्के राहील.

याखेरीज अनेक गंभीर आजारावरच्या औषधांवरचा कर आता शून्य टक्के झाला आहे. या बाबत ऐकूया डॉ. सौरभ पटाईत यांनी दिलेली प्रतिक्रीया....

**होल्ड - बाईट- सौरभ पटाईत**

*GST सुधारणेमुळे आरोग्य क्षेत्राला नक्कीच दिलासा दिला आहे. जसे की आरोग्य विम्यावरील GST १८% वरून शून्य करण्यात आला आहे, यामुळे रुग्णांना वैयक्तिक आरोग्य विमा परवडेल तसेच विमा पॉलिसी कमी खर्चात उपलब्ध होईल. त्याचप्रमाणे कर्करोग आणि दुर्मिळ रोगांच्या औषधांवरील GST ही शून्य करण्यात आला आहे. यामुळे किमोथेरपीसारखी प्रक्रिया कमी खर्चात उपलब्ध होईल, तसेच गौचर डिसिस, मस्क्युलर डिस्ट्रॉफी, ब्लड कॅन्सर  यासारख्या रोगांची औषधेही स्वस्त दरात उपलब्ध होतील. सध्या भारत डायबेटिस कॅपिटल बनण्याच्या मार्गावर आहे, तसेच हार्ट अटॅकचे प्रमाणही वाढले आहे. ग्लुकोमीटर , अँजिओप्लास्टी स्टेंट , MRI हे कमी दरात उपलब्ध झाल्यामुळे रुग्णांवरील आर्थिक भार कमी होण्यासाठी मदत होईल.*

*या सुधारित GST मुळे रुग्णांना कमी दरात दर्जेदार सेवा उपलब्ध होतील, तसेच फार्मा कंपन्यांनाही नवीन औषधे बाजारात उपलब्ध करण्यासाठी आणि दुर्मिळ आजारांवरील औषधांच्या संशोधनावर भर देण्यासाठी प्रोत्साहन मिळेल.*

जीएसटीवरचे नवीन दर येत्या २२ सप्टेंबरपासून लागू होणार आहेत.

**<><><><><>**

बिहारमध्ये सुधारित मतदार याद्यांमध्ये समावेश करण्यासाठी आधार कार्डाला ओळखपत्र म्हणून मान्यता द्यावी, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं आज निवडणूक आयोगाला दिले. याचा अर्थ, मतदार यादीत नाव घालण्यासाठी फक्त आधार कार्ड, निवडणूक आयोगानं सांगितलेल्या इतर ११ ओळखपत्रांप्रमाणेच ग्राह्य धरलं जाईल. तशा सूचना अधिकाऱ्यांना द्याव्यात, असंही न्यायमूर्ती सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जोयमाल्य बागची यांच्या पीठानं निवडणूक आयोगाला सांगितलं. तसंच मतदारांनी सादर केलेल्या आधार कार्डाची पडताळणी करायचे अधिकार या

अधिकाऱ्यांना असतील, असंही न्यायालयानं नमूद केलं. त्याचवेळी, आधार कार्ड हा नागरिकतेचा पुरावा नाही, असंही न्यायालयानं आदेशात स्पष्ट केलं.

**<><><><><>**

नेपाळ मधे समाज माध्यमांवरच्या बंदीविरोधात तरुणांनी काढलेल्या मोर्चावर पोलिसांनी केलेल्या गोळीबारात १९ जणांचा मृत्यू झाला, तर ३४० पेक्षा जास्त जण जखमी झाले. या पार्श्वभूमीवर नेपाळ सरकारने विविध भागांत संचार बंदी लागू केली आहे. नेपाळचे प्रधानमंत्री के.पी. शर्मा ओली यांनी आज संध्याकाळी काठमांडूत त्यांच्या निवासस्थानी मंत्रिमंडळ आणि राष्ट्रीय सुरक्षा परिषदेची तातडीची बैठक बोलावली आहे.

नेपाळ सरकारनं नोंदणीकृत नसलेल्या विविध समाज माध्यमांवर फेसबुक, इन्स्टाग्राम, व्हॉट्सॲप, एक्स आणि युट्यूब या समाजमाध्यमांवर ४ सप्टेंबरपासून बंदी घातली. या निर्णयावर नाराज झालेल्या युवा वर्गानं आज तिथल्या संसदेवर मोर्चा काढला. यावेळी आंदोलक आणि पोलिसांमध्ये संघर्ष झाला.

दरम्यान, आंदोलनाला नेपाळमधल्या विविध गटांनी पाठिंबा दर्शवला आहे.

**<><><><><>**

भारत आणि इस्रायल यांच्यात आज नवी दिल्ली इथं द्विपक्षीय गुंतवणूक करार झाला. अर्थमंत्री निर्मला सीतारामन आणि इस्रायलचे अर्थमंत्री बेझालेल स्मोट्रिक यांनी या करारावर स्वाक्षरी केली. दोन्ही देशातले आर्थिक संबंध बळकट करणं या कराराचा उद्देश आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रात नागपूर शहर विकासासाठी NMRDA अर्थात Nagpur Metropolitan Region Development Authority आणि हुडको, NBCC अर्थात National Buildings Construction Corporation यांच्यात आज मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत

करार करण्यात आला. या प्रकल्पाअंतर्गत १७१० एकरमध्ये नवीन नागपूर क्षेत्र विकसित होणार असून १४८ किलोमीटरचा नागपूर आऊटर रिंगरोड विकसित केला जाणार आहे. ११ हजार ३०० कोटी रुपये हुडको देणार आहे.

<><><><>

मराठा आरक्षणाबाबत महाराष्ट्र सरकारनं काढलेल्या जीआर विरोधात न्यायालयीन आणि रस्त्यावरच्या लढाईसाठी ओबीसी संघटनांनी तयारी दर्शवली आहे. त्यानुसार ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात नागपुरात ओबीसींचा महामोर्चा काढला जाईल, तसंच विविध ओबीसी संघटना या आठवड्यात न्यायालयात याचिका देखील दाखल करणार आहेत. आज मुंबईत, राज्यातल्या विविध ओबीसी संघटनाच्या बैठकीत हा निर्णय झाल्याचं ओबीसी नेते तथा काँग्रेसचे विधानसभेतले गटनेते विजय वडेट्टीवार यांनी सांगितलं.

<><><><>

आशियाई महिला हॉकी चषक स्पर्धेत भारताच्या संघानं सिंगापूरवर १२-० असा दणदणीत विजय मिळवत सुपर फोर फेरीत धडक मारली. नवनीत आणि मुमताज यांच्या हॅटट्रिक्सच्या जोरावर भारतानं हा विजय मिळवला. भारताचा पुढचा सामना परवा अ गटातल्या दुसऱ्या क्रमांकावरच्या संघाबरोबर होणार आहे.

<><><><>

जम्मू-काश्मीरच्या कुलगाम जिल्ह्यात आज सकाळी सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमधे झालेल्या चकमकीत दोन दहशतवादी ठार झाले, तर एक जवान जखमी झाला आहे. जखमी जवानाला रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. कुलगाम जिल्ह्यातल्या गुड्डर परिसरात दहशतवादी लपल्याची माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा दलांनी शोधमोहीम सुरू केली होती, दहशतवाद्यांच्या ठिकाणापर्यंत सुरक्षा दलाचे जवान पोहोचताच दहशतवाद्यांनी गोळीबार सुरू केला. त्याला सुरक्षा दलांनी प्रत्युत्तर दिलं.

**<><><><><>**

विद्यार्थ्यांनी आयुष्यात मोठं ध्येय ठेवावं आणि आपल्या ध्येयाचा पाठलाग प्रामाणिकपणे करावा, असा सल्ला संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी दिला. ते आज दिल्लीतल्या नेव्ही चिल्ड्रन स्कूलमधे शाळेच्या हीरक महोत्सव समारंभात बोलत होते. शिस्त, सेवा आणि देशभक्ती ही मूल्ये विद्यार्थ्यांमधे रुजवून त्यांचं चारित्र्य घडवण्यात नेव्ही चिल्ड्रन स्कूलची भूमिका महत्त्वाची असल्याचं राजनाथ सिंह म्हणाले. ही शाळा येणाऱ्या पिढ्याना प्रेरणा देते, असे गौरवोद्गार त्यांनी काढले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनीही मनोगत व्यक्त केलं.

**<><><><><>**

ओबीसी आरक्षणाबाबत सरकार ठाम असून ओबीसींच्या ताटातलं आरक्षण कुणाच्याही ताटात जाऊ दिलं जाणार नाही, असं महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज नागपुरात सांगितलं. येत्या बुधवारी ओबीसी उपसमितीची बैठक होणार आहे. त्यात छगन भुजबळ, पंकजा मुंडे, यांच्यासह सहा-सात मंत्री सहभागी होणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

//<><><><><>//